पुण्यनगरी

# सर्वच घटकांसाठी 'स्कील' मार्गदर्शक ठरेल : कुलगुरू

कोल्हापूर : प्रतिनिधी

कौशल्य निर्मिती आणि विकास या क्षेत्रांमध्ये डॉ. आण्णासाहेब गुरव प्रभावी कामगिरी बजावत आहेत. त्यांच्या अनुभवातून निर्माण झालेले 'स्कील' पुस्तक निश्चितपणे सर्वच घटकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील प्राध्यापक आणि कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. आण्णासाहेब गुरव आणि प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे यांनी लिहिलेल्या 'स्कील' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सभागृहात करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. डॉ. गुरव यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. साळुंखे यांनी आभार मानले. अजित चौगुले, डॉ. सरिता ठकार, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. केदार मारुलकर आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'विद्यार्थी हित जपणारे डॉ. जे. एफ. पाटील'

## अर्थशास्त्र विभागात शोकसभा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना घडवणारे सातत्याने मार्गदर्शन करणारे आणि संशोधक विद्यार्थ्यांना पुढे नेणारे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांची उणीव विद्यापीठात कायम राहणार आहे, अशी भावना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

अर्थशास्त्र विभागात आयोजित करण्यात आलेल्या डॉ. जे. एफ. पाटील यांच्या शोकसभेच्या प्रसंगी बोलताना व्यक्त केले. निवृत्तीनंतरही बावीस वर्षे त्यांनी विविध क्षेत्रांत आपले योगदान दिले. चांगला शिक्षक हा कधीही निवृत्त होत नाही, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. जे. एफ. पाटील असे विचार डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली. महावीर अध्यासनाच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान आहे. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. जे. एफ. पाटील यांचे समाजातील भरीव योगदान न विसरण्यासारखे आहे, असे मत व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी डॉ. जे. एफ. पाटील यांच्या कार्याची माहिती दिली व आपल्या भावना व्यक्त केल्या. डॉ. निशा पवार, डॉ. विजय ककडे, डॉ. भारती पाटील, डॉ.पी.एस. कांबळे, डॉ. तळुले, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. राहुल म्होपरे, डॉ. मारुलकर आणि विठ्ठल ठब्बे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

तरूण भारत

# शब्द साहित्यातून सांस्कृतिक आशय शोधला पाहिजे

■ डॉ. मुकुंद कुळे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

"लोकसाहित्याच्या निर्मितीमागे समूह मनाची प्रेरणा काम करत असते. त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक आशय शब्द साहित्यातून शोधला पाहिजे. लोकसाहित्याचं संचित व्यक्तीचं न राहता समूह मनाचं होतं"", असे प्रतिपादन डॉ. मुकुंद कुळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित 'लोकविद्या आणि लोकसंस्कृती: अभ्यास आणि संवर्धन" या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

डॉ. कुळे म्हणाले, परंपरेने चालत आलेल्या गोष्टी विवेकबुद्धीने स्वीकारून त्या पुढच्या पिढीकडे संक्रमित केल्या पाहिजेत. आता अशी कामे महाविद्यालयांनी, विद्यापीठांनी हाती घेणे गरजेचे आहे. डॉ. नीला जोशी म्हणल्या, 'लोकजीवन, लोकमानस, लोकश्रद्धा यांचे सवर्धन करणे काळाची



गरज आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून लोकसाहित्याचे संकलन आणि संशोधन करणे ही आपली जबाबदारी आहे. डॉ. रणधीर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविक अभ्यासकेंद्रप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

या कार्यशाळेसाठी सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील समन्वयक उपस्थित होते. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 DEC 2022
पुण्यनगरी



**विज्ञानाच्या विश्वात**

डॉ. व्ही.एन. शिंदे

# सोनेरी शोध; काळी किनार

जग बदलले, अशा शोधांसाठी काही दिवसांपूर्वी बीबीसीने सर्वेक्षण केले. जगभरातील लोकांच्या कौलानुसार आठ शोधांची यादी बनली. त्या यादीवर नजर टाकल्यानंतर असे लक्षात येते की, या शोधांच्या सोनेरी रूपाला एक काळी किनार आहे. प्रत्येक शोधानंतर जगात आमुलाग्र बदल झाले हे खरेच; मात्र ते शोध लागले तेव्हा या काळ्या बाजूचा कधीही विचार झाला नाही. हा विषय मनात येण्याचे खरे कारण एलॉन मस्कची राक्षसी महत्त्वाकांक्षा आणि अमानवी प्रयोग, हेच आहे.

या आठ शोधांमध्ये लोकांच्या मते सर्वात महत्त्वाचा शोध ठरतो तो इलेक्ट्रिक बल्बचा! थॉमस अल्वा एडिसन याचा हा शोध. काचेच्या निर्वात गोळ्यामध्ये धातूचा तुकडा तापवून त्यापासून पिवळा प्रकाश मिळवण्यात आला, असा हा शोध. त्यानंतर बल्बमध्ये मोठे बदल झाले. आता असे बल्ब क्वचित मिळतात. मात्र, हा शोध लागल्यानंतर लोक रात्रीही दिवसांप्रमाणे साजरी करू लागले. रात्री उशिरापर्यंत जागणे, आनंद मिळवणे सुरू झाले. त्याचबरोबर कारखाने रात्रंदिवस सुरू राहू लागले. साधन संपत्ती निर्मितीकडे कल वाढला. त्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला. मानवाला रात्रपाळी करणे क्रमप्राप्त ठरले आणि हजारो पिढ्यांची रात्रीच्या झोपेची सवय मोडली.

दुसरा महत्त्वाचा शोध ठरला तो चारचाकी वाहनांचा. याने माणसाचा प्रवास सुखकर आणि जलद केला. मात्र, इंधनांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला. त्यातून प्रदूषणाची समस्या मूळ धरू लागली. १८८६ ला पहिली मोटार बनली आणि पंधरा वर्षांत लंडनच्या रस्त्यावरून घोडागाडी गायब झाली. तिसरा महत्त्वाचा शोध मानला गेला तो सिमेंट काँक्रीटचा. जोसेफ एस्पाडीनने १८२४ मध्ये हा शोध लावला. या शोधाने मातीची आणि लाकडाची घरे कमी व्हायला सुरुवात झाली. घरांची देखभाल, दुरुस्ती कमी झाली. त्यासाठी मोठ्या प्रमाणात जमीन पोखरली जाऊ लागली. खाणकाम वाढले. घरांचा आकार आणि उंची दोन्ही वाढली. चौथा महत्त्वाचा शोध मानला जातो तो लिफ्टचा. जगातील पहिली लिफ्ट एलिशा ओटीसने बनवली आणि ती इंग्लंडच्या राजवाड्यात बसवली. या शोधाने घरांची उंची मोठ्या प्रमाणात वाढली.

पाचवा महत्त्वाचा शोध मानला जातो तो प्लास्टिकचा! लिओ बेकलँड या अमेरिकन संशोधकाने हा शोध लावला आणि जगातील पॅकेजिंग संकल्पना बदलल्या. कापडी पिशवीत येणाऱ्या वस्तूही प्लास्टिकमध्ये यायला लागल्या. प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की, अनेक देशांत कायदे करूनही त्याचा वापर थांबवणे अशक्य झाले आहे. ज्याचा पुनर्वापर करता येतो ते प्लास्टिकही कचऱ्यात जाते. त्यामुळे भारतासह अनेक देशांत गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यात प्लास्टिक लवकर कुजत नाही. आज त्याचे अंश अन्न, पाणी, मिठातून पोटात जात आहेत. त्यातून अनेक जनावरे मृत्युमुखी पडत आहेत. मात्र, याचे गांभीर्य लक्षात येऊनही प्लास्टिकचा वापर थांबवणे कोणत्याही देशाला शक्य झाले नाही. प्लास्टिक वैश्विक समस्या बनले आहे.

सहावा शोध कॅमेऱ्याचा मानला गेला आहे. जॉर्ज इस्टमन या अमेरिकन संशोधकाने १८८८ मध्ये पहिला कॅमेरा बनवला. कॅमेऱ्यामुळे स्मृती जतन करून ठेवणे, चलतचित्रफिती बनवणे सहज शक्य झाले. माणसं आज सेल्फीवेडी झाली आणि त्या नादात काही तरुण-तरुणी जीव गमावू लागले. मात्र, हा वैयक्तिक पातळीवरचा अविचारी वापर ठरतो. गुन्हेगारी कारणांसाठीही याचा वापर केला जातो. मात्र, विज्ञान-तंत्रज्ञान विकसित नव्हते त्या काळातही गुन्हेगारी होती, हे लक्षात घेता कॅमेराचा शोध महत्त्वाचा ठरतो. सातवा शोध मोबाईल फोनचा निवडण्यात आला. मोबाईल फोनमुळे संदेशवहन गतिमान झाले यात शंकाच नाही. मार्टिन कूपर नावाच्या तंत्रज्ञाने ३ एप्रिल १९७३ रोजी प्रथम भ्रमणध्वनीवरून संवाद साधला, असे मानले जाते. मात्र, त्याचाही आता अतिरेक झाला आहे. मोबाईलमध्ये कॅमेरा आला, गेम्स आले, इंटरनेट आले, समाज माध्यमांची वेगवेगळी ॲप आली आणि मानवाचे व्यक्तिगत असे काही राहिलेच नाही. आपण खेचलेले प्रत्येक छायाचित्र जगात कोठे तरी, कोणी तरी पहात असतो. आपण कोठे आहोत, काय करतो याची बित्तंबातमी कोणाजवळ तरी नोंदवली जात असते. त्याचा अनेकदा गैरवापरही होताना दिसतो. त्यातच कोरोना काळात ऑनलाईन कामाच्या नावाखाली आठ तास कर्तव्याचे राहिले नाहीत. भ्रमणध्वनीने कायम कामात राहण्याची सवय लावली आहे.

यादीतील आठवा शोध इंटरनेटचा मानला जातो. आंतरजालामुळे सारे जग छोटे खेडे बनले. कोणाशीही कोठेही, कधीही संपर्क करणे शक्य झाले. घरातील माणसं मात्र दुरावली. विज्ञान संशोधनाने आणखी गती घेतली. १९८६ साली केवळ २३८ लोक आंतरजालाचा वापर करत असत. हा आकडा केवळ चार वर्षांत तीन लाख १३ हजार इतका वाढला. आज पाच अब्जांपेक्षा अधिक, म्हणजेच जगाच्या लोकसंख्येतील ६३.७ टक्के लोक आंतरजालाने जोडलेले आहेत. भ्रमणध्वनीवर आंतरजाल आल्यानंतर हा वेग कमालीचा वाढला. साधारण ९२ टक्के लोक भ्रमणध्वनीवरून आंतरजालाचा वापर करतात. प्रती व्यक्ती सरासरी साडेसहा तासांपेक्षा जास्त वापर आहे. त्यातील अडीच तासांपेक्षा जास्त वेळ हा समाजमाध्यमांसाठी वापरला जातो. लोकांचा मोठ्या प्रमाणात वेळ खाणारा हा शोध आहे. कॅमेरा वगळता इतर सर्व शोधांनी मानवी जीवनावर मोठा परिणाम केला आहे. प्लास्टिकसारख्या शोधाने तर निसर्ग आणि पर्यावरण धोक्यात आणले आहे. नैसर्गिक संसाधनांची लूट करण्याचे कारण मोटार आणि सिमेंटचा शोध बनला. या आठ शोधांनी आपले जग बदलून टाकले हे दोन्ही अर्थांनी खरे आहे.

संपर्क : ९६७३७८४४००
vilasshindevs44@gmail.com

पुढारी

# विद्यापीठ आजीवन अध्ययन, विस्तार विभागातर्फे आरोग्य शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग सीपीआर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स विषयक जाणीव जागृती याविषयावर व्याख्यान व आरोग्य



शिबीर झाले. क्लिनिकल सायकॉलॉजीचे डॉ. दीपक सावंत यांनी एच. आय. व्ही. एड्सबाबत माहिती दिली. यावेळी सीपीआरच्या योगी डांगे, सारंग परीट, वेदांत कोळपकर यांनी तपासणी केली. यावेळी डॉ. रामचंद्र पवार व डॉ. सुमन बुबा, उदय घाटे, असावरी कागवाडे उपस्थित होत्या. अरविंद पालके यांनी आभार मानले.

सकाळ

# दर्जेदार अभिव्यक्तीसाठी समाजमाध्यमांचा वापर हवा : जत्राटकर

कोल्हापूर : दर्जेदार अभिव्यक्तीसाठी समाजमाध्यमांचा प्लॅटफॉर्म वापरावा. उच्च प्रतीचे वैचारिक आदान -प्रदान होऊन समाजमानस घडविणे अगर मतनिर्मिती होण्यासाठी समाजमाध्यमे महत्त्वाची आहेत, असे मत शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे सायबर जागरुकता दिवस कार्यक्रमांतर्गत मराठी विषयाने आयोजित केलेल्या 'समाजमाध्यमे आणि सायबर सुरक्षा' या विशेष ऑनलाइन व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे होते. या वेळी डॉ. जत्राटकर म्हणाले, ''समाजमाध्यम योग्य पद्धतीने हाताळण्याचे भान वापरकर्त्यांना असले पाहिजे. नवतंत्रज्ञानाचा हात धरून आलेल्या गेमिंग व अतिरेकी वापरामुळे तरुणांमध्ये हिंसेची तीव्रता वाढली आहे. हे थांबावे. समाजमानस कलुषित करण्यासाठी समाजमाध्यमाचा वापर टाळला पाहिजे.'' डॉ. बनसोडे म्हणाले, ''आपण सोशल मीडिया वापरताना त्याचा इतरांनी गैरफायदा घेऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे.'' या वेळी डॉ. पी. एस. लोंढे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एस. डी. भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले.

सकाळ

# 'यसबा' करंडक महोत्सव रविवारी

कोल्हापूर : ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक (कै.) यशवंत भालकर यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि यशवंत भालकर फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता.१८) यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव रंगणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना कलेची आवड वाढावी व कला सादरीकरणासाठी मुक्त व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने हा महोत्सव होणार असून, शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनात सकाळी नऊला महोत्सवाला प्रारंभ होईल. शहर आणि परिसरातील १५ शाळांचे विद्यार्थी कलाकार महोत्सवात सहभागी होणार असून, चित्रकला, निबंध, एकपात्री अभिनय, समूह गायन, समूह नृत्य अशा पाच कलाप्रकारांमध्ये हा महोत्सव होईल. 'यसबा करंडक' हा फिरता असणार आहे. नृत्य दिग्दर्शक संग्राम भालकर यांची संकल्पना असून, हे महोत्सवाचे पहिले वर्ष आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. प्रकाश गायकवाड आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांचे विशेष सहकार्य मिळाले असल्याचे संदीप भालकर, सपना जाधव यांनी सांगितले.

तरूण भारत

# रविवारी विद्यापीठात 'यसबा करंडक' कला महोत्सव

कोल्हापूर

कोल्हापूर भुषण, सिनेट सदस्य, सामाजिक व सांस्कृतिक चळवळीमध्ये कोल्हापूरचे वैभव वाढवणारे विक्रमी १४ पुरस्कार विजेते कोल्हापूरचे सुपुत्र चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या चौथ्या स्मृती दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग,, कोल्हापूर व चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.हा महोत्सव १८ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये होणार आहे. यामध्ये जवळपास १५ शाळांचे विद्यार्थी कलाकार सहभागी होणार आहेत.. चित्रकला – निबंध – एकपात्री – समूह गायन – समूह नृत्य अशा पाच कलाप्रकारामध्ये ही स्पर्धा होईल. 'यसबा करंडक" फिरता करंडक असणार आहे.. महोत्सवाची संकल्पना संग्राम यशवंत भालकर यांची असून हे महोत्सवाचे पहिले वर्ष आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. प्रकाश गायकवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी विशेष सहकार्य केले आहे. फौंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव यसबा करंडक समिती सदस्य भुषण पाठक, आशिष हेरवाडकर , आकाश लिगाडे, अभय पाटील,राजनंदिनी पत्की, या कार्यक्रमासाठी कार्यरत आहेत.

लोकमत

# यसबा करंडक कला महोत्सव रविवारी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या ४ थ्या स्मृती दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाउंडेशनच्यावतीने रविवारी (दि. १८) यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव होणार आहे.

रविवारी सकाळी ९ वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ येथे चित्रकला, निबंध, एकपात्री, समूह गायन, समूह नृत्य अशा पाच कलाप्रकारांमध्ये ही स्पर्धा होईल. महोत्सवाची संकल्पना संग्राम यशवंत भालकर यांची असून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन संदीप भालकर व सपना जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठातर्फे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी १९ डिसेंबर प्रवेश अर्ज भरण्याची मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता थेट द्वितीय वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी दि. १९ डिसेंबरपर्यंत विनाविलंब शुल्क विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे.

थेट द्वितीय व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया उशिरा झाल्याने काही विद्यार्थी अद्याप परीक्षेसाठी अर्ज भरू शकलेले नाहीत. त्यामुळे विद्यापीठाने अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा जाहीर केल्या आहेत. महाविद्यालय व पदव्युतर विभागाने २० डिसेंबरपर्यंत परीक्षा अर्ज ऑनलाईन अप्रूव्ह करायचे आहेत. महाविद्यालयांनी २१ डिसेंबर रोजी विद्यापीठात परीक्षा अर्ज याद्या सादर कराव्यात, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

तरुण भारत

# व्यावसायिक अभ्यासक्रम परीक्षा अर्जास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्रला थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विनाविलंब शुल्कासह १९ डिसेंबरपर्यंत अर्ज भरावयाचा आहे. तर महाविद्यालय आणि अधिविभागांनी अर्जाला ऑनलाईन ॲप्रुअल २० डिसेंबरपर्यंत विनाविलंब शुल्कासह द्यायचे. महाविद्यालय व अधिविभागांनी अर्जांच्या याद्या परीक्षा विभागात २१ डिसेंबरपर्यंत सादर करायच्या आहेत. माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.